पदोन्नती

गोपनीय अभिलेख्यांच्या प्रतवारीचे निकष.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक: एसआरव्ही-1088/(प्र.क्र.11/88)/12,
मंत्रालय, मुंबई-400 032, दिनांक 21 फेब्रुवारी, 1994.

वाचा :-
1) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: इएसबी-सीएफआर-1085/868/13, दिनांक 9 सप्टेंबर, 1988.
2) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-1074/ड, दिनांक 28 जानेवारी, 1975.
3) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-1077/सीआर-343/79/12, दिनांक 18 मे, 1983.
4) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-1088/प्र.क्र.11-88/12, दिनांक 18 ऑक्टोबर, 1988.

शासन निर्णय

सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक: इएसबी-सीएफआर-1985/868/तेरा, दिनांक 9 सप्टेंबर, 1988 च्या शासन निर्णयान्वये शासकीय सेवकांच्या प्रतिवर्षी लिहिल्या जाणा-या गोपनीय अभिलेख्यांची प्रतवारी कोणती ठरवावी, याबद्दलच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-1074/ड, दिनांक 28 जानेवारी, 1975 अन्वये वर्ग-1 मधील (आता गट अ) प्रथम पदोन्नतीच्या सर्व पदांवरील पदोन्नत्या, ज्येष्ठता अधीन पात्रता आणि त्यानंतरच्या वरच्या पदांवरील पदोन्नत्या निव्वळ गुणवत्ता तत्वांनी करण्यात याव्यात, असे शासनाचे धोरण आहे. पदोन्नतीसाठी पात्रता ठरविताना शासकीय सेवकांचे लगतचे 5 वर्षांचे गोपनीय अभिलेख तपासले जातात. परंतु गोपनीय अभिलेख्यांच्या प्रतवारीचा निकष कोणता असावा यासंबंधीचे निश्चित असे आदेश निर्गमित केलेले नाहीत. त्यामुळे निवडसूची बनविताना पात्रतेच्या निकषाबाबत संदिग्धता रहात असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. अतएव, शासनाने या बाबींसंबंधात सर्वंकष तपासणी करुन वरच्या पदावर पदोन्नती देण्यासाठी गोपनीय अभिलेख्यांच्या प्रतवारीचे निकषांबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेतले आहेत :-

(1) शासन सेवेतील गट अ मधील प्रथम पदांवरील पदापर्यन्तच्या सर्व गटांतील पदोन्नत्या ज्येष्ठता अधीन पात्रता या निकषानुसार देण्यात याव्यात. पात्रता निश्चित करण्यासाठी विचारक्षेत्रातील सर्व अधिका-यांचे 5 वर्षांचे गोपनीय अभिलेख तपासून शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-1089/3654/प्र.क्र.12/89/12, दिनांक 28 मार्च 1990 मध्ये नमूद केल्याप्रमाणे ज्यांच्या गोपनीय अभिलेख्यांची किमान सरासरी प्रतवारी "ब" (बी) येत असेल तर संबंधितांना ज्येष्ठतेनुसार निवडसूचीत अंतर्भूत करण्यात यावे.

(2) गट अ मधील दुस-या टप्प्यानंतरच्या, परंतु ज्या पदांच्या वेतनश्रेणीतील किमान वेतनश्रेणीचा टप्पा रु.5100/- आहे अशा सर्व पदांवरील पदोन्नत्या निव्वळ गुणवत्ता(Strict Selection) नुसार देण्यात याव्यात. त्यासाठी 5 वर्षांच्या गोपनीय अभिलेख्यांची किमान सरासरी प्रतवारी "ब+" अशी निश्चित करण्यात यावी.

(3) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-1077/सीआर-343/79/12, दिनांक 18 मे, 1983 आणि शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-1088/प्र.क्र.11-88/12, दिनांक 18 ऑक्टोबर, 1988 अन्वये निवडसूचीमध्ये समावेश झालेल्या अधिका-यांच्या बाबतीत ज्यांचे गोपनीय अभिलेख अत्युत्कृष्ट "अ+" किंवा उत्कृष्ट "अ" प्रतीचे असतील त्यांना निवडसूचीमध्ये अनुक्रमे 6 आणि 2

(पृ.मा.प.)

स्थानापर्यन्त परचढपणा द्यावा असे आदेश आहेत. 2 स्थानापर्यन्त परचढपणा देण्याबाबतचे आदेश आता मागे घेण्यात येत आहेत. अत्युत्कृष्ट "अ+" प्रतवारी असणा-या अधिका-यांस/कर्मचा-यांस निवडसूचीमध्ये 6 स्थानापर्यन्त परचढपणा देण्याचे विद्यमान आदेश पुढील आदेश होईपर्यन्त कार्यान्वित राहतील. मात्र अशा अधिका-यांस ज्येष्ठ असलेल्या अधिका-यांचे अभिलेख "अ" प्रतवारीचे असतील तर त्यांचे पर "अत्युत्कृष्ट" गोपनीय अभिलेख असणा-या अधिका-यांस परचढपणा देण्यात येऊ नये.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

प.मा. जोशी.

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

1. राज्यपाल यांचे सचिव,
2. मुख्य मंत्री यांचे सचिव,
3. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक ऑफ इंडिया बिल्डिंग, फोर्ट, मुंबई (पत्राने),
4. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई (पत्राने),
5. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई (पत्राने),
6. प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई (पत्राने),
7. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई (पत्राने),
8. महालेखापाल, महाराष्ट्र-1, मुंबई,
9. महालेखापाल, महाराष्ट्र-2, नागपूर,
10. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
11. विविध मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
12. मंत्रालयीन सर्व विभाग,
13. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने.

---